# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## नोटीस

( पुरवणी विषय पत्रिका )

नागपूर महानगरपालिकेची बुधवार दिनांक 20/02/2019 रोजी सकाळी 11–00 वाजता श्रीमंत राजे रघोजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे भरणाऱ्या सर्वसाधारण सभेकरिता मा. सदस्यांनी दिलेल्या नोटीस विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

आदेशान्वये,

नागपूर
दिनांकः– 16/02/2019

हस्ता/–

( हरीश नवलकिशोर दुबे )
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

वि.क्र.299 : –
(आरोग्य विभाग)
(मा. श्री. जितेन्द्र घोडेस्वार)

नागपूर महानगरपालिकेच्या दि. 21.01.2016 रोजी पारीत ठराव क्र. 204 अन्वये 4500 ऐवजदार सफाई कर्मचारी यांना सफाई कर्मचाऱ्यांच्या पदांवर स्थायी करण्याकरिता वर्षनुवर्षे वारंवार व तेच ते प्रशासनीक कारण पुढे न करता त्यांना त्यांचे स्थायी होण्याच्या अधिकारापासुन वंचित न करता, म.न.पा. ठराव क्र. 88 दि. 20.04.2015 अन्वये ज्या धर्तीवर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना मनपा सेवेत नियमित केले. त्याच धर्तीवर ऐवजदार कर्मचाऱ्यांना स्थायी करण्याचा नोटीस विचारार्थ व निर्णयास्तव सादर करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.300 : –
(लोककर्म विभाग)
(मा. श्री. हरीश ग्वालबंशी)

नागपूर महानगरपालिके द्वारे शहरात जनतेच्या हिताकरिता सार्वजनिक जनसंवाद कार्यक्रम घेण्यात येतात. हे कार्यक्रम आयोजित करतांना कोणत्या शिष्टाचार (प्रोटोकाल) च्या नियमानुसार घेण्यात येतो. तसेच बॅनर, पत्रिकामध्ये काय नमूद करतात व नागपूर महानगरपालिकेचे मानचित्र (लोगो) लावण्यात येतो कां या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे..

वि.क्र.301 : –
(आरोग्य विभाग)
(मा. सौ. प्रणित शहाणे)

नागपूर मनपाच्या लाड–पागे शिफारसीनुसार सफाई कामगार पदोन्नत होऊन ड्रायव्हर या पदावर पदोन्नत झाल्यानंतर नागपूर मनपाच्या पदस्थापनेत ड्रायव्हर यांचे (वेतन श्रेणी 5200–20200 ग्रेड पे 1900) असून हे पद वर्ग – 3 मध्ये गणल्या जात होते. सफाई कामागार पदोन्नत होऊन काही कामगार जमादार/हवालदार म्हणून पदोन्नत झाले तर काही कामगार ड्रायव्हर म्हणून पदोन्त झाले.

जमादार हवालदार यांचे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी या पदाची (वेतन श्रेणी 4400–7440 ग्रेड पे 1300–1800) सुधारणा करण्यासाठी तसेच हे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी व त्यांच्या वारसांना लाड–पागे कमेटीचा लाभ मिळण्यासाठी मनपा ठराव क्र. 186 दि. 20.02.2018 अन्वये सभागृहाने ठराव पारीत केला. मात्र सफाई कामगार पदोन्नत होऊन ड्रायव्हर पदावर पदोन्नत

झाल्यास त्यालाही जमादार/हवालदार प्रमाणेच ड्रायव्हर हे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी या पदाची (वेतन श्रेणी 4400–7440 ग्रेड पे 1300–1800) सुधारणा करण्यासाठी तसेच हे पद वर्ग 4 मध्ये आणण्यासाठी व त्यांच्या वारसांना लाड–पागे कमेटीचा लाभ मिळण्यात यावा याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.
टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 302 : – (आसीनगर झोन क्र. 09) (मा. सौ. ममता सहारे) प्रभाग क्र. 9 अंतर्गत कामठी रोड वरील पाटणी आटोमोबाईल जवळ भारत सिनेमा परिसरात स्क्रोल विनिमय प्रा.लि. तर्फे डायरेक्ट श्री. लक्षमण मनोहर सावंत द्वारा राय उद्योग लि. यांनी सुरु केलेल्या, मौजा–सिताबर्डी, खसरा क्र. 101/2, 102/2, 108 न.भू.क्र. 1870/1,1872 येथील प्रस्तावित बांधकामामुळे 70 वर्षे जुनी ट्रंक लाईन डॅमेज झाल्याने त्याची जबाबदारी निश्चित करण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.
टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 303 : – (जलप्रदाय विभाग) (मा. सौ. आभा पांडे) शहरावर जलसंकट असल्याबाबतची सत्य परिस्थिती तसेच मनपाच्या सभेत जलसंकटाबाबतचे झालेल्या चर्चेचे निराकरण न झाल्याबाबतचे सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.
टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.304 : – (आरोग्य विभाग) (मा. श्री. प्रवीण दटके) मनपा ठराव क्र. 296 दि. 20.10.2018 अन्वये महानगरपालिकेच्या सेवेत असतांना मृत्यु झालेल्या वैद्यकीय दृष्टया अपात्र ठरलेल्या ऐवजदार सफाई कामगारांना वारसापैकी एकाला समक्रमांकाचे, म्हणजेच मृत्यु ऐवजदाराच्या क्रमांकाचे ऐवजीकार्ड देऊन त्याला मनपाच्या सेवेत रुजू करण्याकरिता तसेच ऐवजदार सफाई कामगार वैद्यकीय कारणामुळे मनपाच्या सेवेत रुजू न झाल्यामुळे तसेच 2 वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी गैरहजर असणाऱ्या अशा ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांचे रद्द करण्यात आलेले ऐवजदार कार्ड पुनर्जिवित करण्यात येऊन त्यांना पुन्हा कामावर घेण्यास्तव सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.
टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र.305 : – (सा.प्र.वि.) (मा. श्री. सुनिल अग्रवाल) ''महानगरपालिकेने उक्त ठरावान्वये महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सेप्रनि–१०९८/प्र.क्र. ७/९८/१२ दि. २५.१.१९९९ अन्वये नागपूर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणक हाताळणी/वापरा बाबतचे ज्ञान प्राप्त करून विहित प्रमाणपत्र दि. ३१.१२.२०१७ पर्यंत सादर करण्यास मुदतवाढ प्रदान केली आहे.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. २००२/प्र.क्र. १४/२/१२ दि. २ सप्टेंबर २००३ अन्वये सध्या शासन सेवेत असलेल्या गट ''अ'' ''ब'' आणि ''क'' मधिल वयाची ५० वर्ष पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्या पासून सूट प्राप्त आहे. आणि सदरहू निर्णय दि. २५.१.१९९९ पासुन लागू आहे.

नागपूर महानगरपालिकेचे प्रशासन ठराव क्र. ९४ दि. १५.९.२०१७ चा चुकीचा अर्थ काढून सध्या मनपा सेवेत असलेले गट ''अ'' ''ब'' आणि ''क'' मधील वयाची ५० वर्ष पूर्ण केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्याचे सक्ती करीत असून त्यांचे वेतनवाढ/कालबध्द पदोन्नती/पदोन्नती थांबविण्याचे कार्य करीत आहे. हे कार्य शासकीय नियम दि. २ सप्टेंबर, २००३ आणि मनपा ठरावा च्या विरूध्द व नियमबाहय आहे.

करीता मनपा ठराव क्र. ९४ दि. १५.९.२०१७ मध्ये स्पष्टता आणण्या करीता दि. २१ सप्टेंबर, २००३ च्या शासन निर्णय अन्वये मनपा सेवेतील गट ''अ'' ''ब'' आणि ''क'' मधिल वयाचे ५० वर्ष पूर्ण केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट देण्यास मान्यता प्रदान करते. तसेच या

कारणामुळे ज्या अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नती/कालबध्द पदोन्नती/वार्षिक वेतनवाढ थांबविण्यात आलेले आहेत ते त्यांना त्यांचा देय दिनांका पासून लागू करण्यात येते.

तसेच महानगरपालिकेतील असे कर्मचारी ज्यांची दि. ३१.१२.२००७ ते जन्म दिनांकानुसार वयाची ५० वर्ष पूर्ण झाली त्या दिनांका पर्यंत वेतनातून वसूलीला महाराष्ट्र शासन (शासन निर्णय) सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) क्र. मातंस–२०१८/प्र.क्र. ५३/से. ५/३९ दिनांक २० नोव्हेंबर २०१८ अन्वये वेतनातून वसुली करण्यास स्थगिती देण्यात येते. सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.''

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 306 : –
(नगर रचना)
(मा. श्री. प्रवीण दटके)

एम्प्रेस मॉल सिटीच्या अनाधिकृत बांधकामाबाबत मा. आमदार. अनिलजी सोले यांनी राज्य शासनाकडे तक्रार असता, मा. मुख्यमंत्र्यांनी आदेश देवून तीन सदस्यीय समिती द्वारे या बांधकामाचे चौकशीचे आदेश दिले होते. या त्रिसदस्यीय मध्ये नगररचना विभाग, अति. आयुक्त श्री. अजिज शेख हे सदस्य होते. समितीचा अहवाल हा सर्वसाधारण सभेच्या पटलावर ठेवून समिक्षा व सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

वि.क्र. 307 : –
(क्रीडा व सांस्कृ. विभाग)
(मा. श्री. सुनिल अग्रवाल)

नागपूर शहर तीव्रगतीने ग्लोबल सिटी व स्मार्ट सिटी होण्याच्या दिशेने वाटचाल करीत असुन नागपूर शहर विकासाच्या वाटचालीत अग्रेषित होतांना स्मार्ट सिटी तेव्हाच होवू शकते जेव्हा त्यात शहरातील नागरीकांचा सक्रिय सहभाग असेल.

शहरातील नागरीकांचा सक्रिय सहभाग होण्याकरीता व त्यांना आपले शहर कसे असावे हे विचार प्रोत्साहित करण्याकरीता नागपूर महानगरपालिका तर्फे Mayor Innovation Award प्रस्तावित करण्यात येत आहे.

Mayor Innovation Award चे प्रामुख्याने २ मुख्य घटक असेल.

१) स्पर्धात्मक आयोजनाद्वारे निवड करणे

२) शहरातील विविध क्षेत्रामध्ये नाव लौकिक केलेल्या मान्यवरांना उत्कृष्ट सीटीजन अवार्ड प्रदान करणे

अवार्ड क्रमांक १ आणि अवार्ड क्रमांक २ करीता प्रक्रिया दरवर्षी जानेवारी महिन्यात सुरू करण्यात येईल.

अवार्ड करीता मा. महापौरजी यांच्या अध्यक्षते खाली एक उच्च स्तरीय ( Mayor Innovation Council ) समितीचे गठन करण्यात येईल. ही समिती कामकाजाचे नियम निर्धारित करेल. व समितीचा निर्णय अंतिम असेल.

महानगरपालिका Mayor Innovation Award दरवर्षी नित्याने आपल्या स्थापना दिवस २ मार्च रोजी समारोहपूर्वक आयोजित करून पारितोषिक प्रदान करतील. या विषयावर सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ''1 (जे)'' प्रमाणे नोटीस.

टिप :– मा. सदस्यांनी सादर केलेली नोटीस नस्तीत उपलब्ध आहे.

———————